## *अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी*

## रक्तपिशवी दर

| अ.क्र | रक्तपिशवी प्रकार | महानगरपालिका रक्तपेढी दर | जिल्हा रुग्णालय रक्तपेढी दर |
|---|---|---|---|
| १ | Whole Blood (संपुर्ण रक्त) | रु.३५०/- रक्त दाता असल्यास रु.५००/- रक्त दाता नसल्यास | रु ८५०/- प्रती पिशवी |

# अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढीचा कामाचा गोषवारा
## रक्तसंकलन व वितरण

| कालावधी | रक्तसंकलन | वितरण |
|---|---|---|
| २०१२ | ५६ | २१ |
| २०१३ | ७१० | ६३१ |
| २०१४ | ७०४ | ६१८ |
| २०१५ मे अखेर | ३१७ | ३१५ |

.सन २०१२ मध्ये रक्तपेढी नुतनीकरण कामी रक्त संकलन व वितरण कमी

# अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी इन्फ्रास्ट्रक्चर

- अहमदनगर महानगरपालिकेची रक्तपेढी कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह येथे दुस-या मजल्यावर सुरु आहे.

- मा.अन्न व औषध प्रशासन नियम १९४५ या नुसार रक्तपेढीची रचना १९७.८४ चौ.मि. क्षेत्रामध्ये करण्यात आलेली आहे.

- वातानुकुलीत डोनर रुम, सिरॉलॉजी रुम, रिफ्रेशमेंट रुम, टी.टी.डी. लॅब, क्वालिटी कंट्रोल रुम, ब्लड स्टोरेज रुम सुविधा.

- इन्टरनॅशनली कॅलिब्रेटेड इक्विपमेंट (ब्लड कलेक्शन मॉनिटर, इन्क्युबेटर, ब्लड बॅग रेफ्रीजरेटर, एलायझा रिडर, वॉशर)

- ४० के.व्ही.ए. ऑटो स्टार्ट जनरेटर बॅक-अप.

- केमीकल रि-एजंट्स व एलायझा किट साठी लॅबॉरेटरी रेफ्रीजरेटर.

# अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी

## माहिती

अहमदनगर महानगरपालिकेची रक्तपेढी तत्कालीन नगरपरिषेदेमार्फत दि.२४ एप्रिल १९८६ रोजी तत्कालीन नगराध्यक्ष मा.श्री.शंकररावजी घुले यांचे कार्यकाळात माजी पंतप्रधान मा.अटलबिहारी वाजपेयी यांचे शुभहस्ते उदघाटन होऊन सुरु झाली. त्यावेळी शहरामध्ये रक्तपेढीची सुविधा फक्त जिल्हा सामान्य रुग्णालय येथे उपलब्ध होती. त्यामुळे तत्कालीन नगरपरिषदेमार्फत सुरु झालेल्या रक्तपेढीचा उपयोग अहमदनगर शहरातीलच तसेच संपुर्ण जिल्ह्यातील गोरगरीब गरजु रुग्णांना झाला. दर्जेदार सेवा, प्रशिक्षित स्टाफ व अत्यल्प शुल्क यामुळे लवकरच ही रक्तपेढी नावारुपास आली. सन २००३ मध्ये नगरपरिषदेचे रुपांतर महानगरपालिकेमध्ये झाले.

सन २०१२ अहमदनगर महानगर पालिकेमार्फ़त रक्तपेढीचे नुतनीकरण झाले असून रक्तपेढी मध्ये अद्यावत मशिनरी, एलायझा रिडर व वॅाशर ,ब्लड स्टोरेज कॅबिनेट व त्यासाठी लागणा-या वातानुकुलीत रुम्स, अशा सर्व अद्यावत उपकरणे व मशिनरी सहित रक्तपेढी चे नुतनीकरण झाले असुन तज्ञ डॉक्टर्स ,प्रशिक्षीत लॅब टेक्निशीयन,स्टाफ नर्स जनसंपर्क अधिकारी या सर्व कर्मचारी समवेत महानगरपालिका रक्तपेढी गोर गरिब रुग्णांना अत्यंत अल्प दरात रक्तपिशव्या गरजे नुसार देत आहे.

रक्तपेढी २४ तास कार्यरत असुन या सेवेचा फ़ायदा महानगरपालिकेच्या प्रसुती गृहातील रुग्ण आणी शहरातील व जिल्ह्यातील गरजु व गोरगरीब रुग्णांना होत आहे.

अहमदनगर महानगरपालिकेचा रक्तपेढी विभाग हा महानगरपालिकेच्या कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृहाच्या इमारतीच्या दुस-या मजल्यावर कार्यान्वीत आहे.

कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व सुतिका गृह १०० खाटांचे रुग्णालय असुन येथे दरमहा ४०० ते ५०० प्रसुती होतात. त्या मध्ये साधारण १०० रुग्णांना सिझेरीयन शस्त्रक्रियेची आवश्यकता भासते. या रुग्णालयामध्ये शहरातील तसेच ग्रामिण भागातील गरोदर माता लाभ घेतात. कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना हे पसुती गृह असल्याने या गरोदर मातांमध्ये हिमोग्लोबीनचे प्रमाण कमी असते. त्यामुळे अत्यावश्यक सेवेच्या दृष्टीने रक्तपेढी सुविधा सदरच्या दवाखान्यास संलग्न असणे अत्यंत आवश्यक आहे. १ एप्रील २०१३ पासुन या दवाखान्यामध्ये केंद्र व राज्य शासनाची **जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम** ही योजना कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. या योजने आतंर्गत दवाखान्यामध्ये येणा-या गरोदर मातांना प्रसुती संदर्भात देण्यात येणा-या सुविधा मोफत पुरविण्यात येत आहेत . त्यामध्ये बाह्यरुग्ण उपचार, आंतररुग्ण उपचार, सोनोग्राफी तपासणी सुविधा, रक्त लघवी तपासणी सुविधा तसेच रक्तपेढी सुविधा मोफत पुरविण्यात येत आहे. त्यामुळे दवाख़ान्यामध्ये उपचार घेणा-या रुग्णांना रक्त पिशवी व रक्तघटकांची आवश्यकता भासते. सध्या महानगरपालिकेकडे रक्तविघटन प्रयोगशाळा ही सुविधा उपलब्ध नसल्यामुळे रुग्णांना खाजगी रक्तपेढी कडुन रक्तघटक आणावे लागतात.त्यामुळे या रुग्णांना नाहक आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. रक्तपेढीची जागा व उपलब्ध असलेला कर्मचारी वर्ग यांचा उपयोग करुन शहरातील व कै.बा.दे.दवाखान्यातील गोरगरीब व गरजु रुग्णांना रक्तघटक वेळेवर अल्प दरात उपलब्ध होणेसाठी महानगरपालिकेच्या रक्तपेढीमध्ये रक्त विघटन प्रयोगशाळा ही सेवा सुरु करणे अत्यंत आवश्यक आहे. सदरची सेवा सुरुकरणेकामी आवश्यक उपकरणे व साहित्य रक्तपेढी करिता खरेदी करणे आवश्यक आहे. रक्तपेढीमध्ये रक्तविघटन प्रयोगशाळा सुरु करणेकामी रु.एक कोटी खर्च अपेक्षित आहे.

# *अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी*

## भविष्यातील नियोजन आराखडा

महानगरपालिकेच्या या रक्तपेढी मार्फ़त (Whole Human Blood) संपुर्ण रक्त ही सुविधा गरजु रुग्णांना अत्यल्प दरात दिली जाते.यावरिल लागणा-या खर्चा पोटी आर्थीक तुट मनपा सहन करत आहे.एका रक्तपिशवी पासुन आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानानुसार रक्त विघटन करुन लाल रक्त पेशी ,प्लाजमा,प्लेट लेट्स,क्रायोप्रेसिपीटेट, हे घटक वेगवेगळ्या रुग्णांना आवश्यकते नुसार दिले जातात.सध्या अहमदनगर शहरामध्ये अशा रक्त विघटन प्रयोग शाळा कार्यरत आहेत.याच धर्तीवर व राज्य रक्त संक्रमण परिषद यांचे सुचनेनुसार रक्तपेढी मध्ये लवकरच रक्त विघटन प्रयोग शाळा (Blood Component Lab) ही सुविधा सुरु करणे आवश्यक आहे.सदर प्रयोग शाळा सुरु करणे कामी आद्यावत मशीनरी व प्रशिक्षीत कर्मचारी वर्ग असणे आवश्यक आहे.

रक्त विघटन प्रयोग शाळा (Blood Component Lab) सुरु करणे कामी अहमदनगर महानगरपालिका स्तरावर प्रयत्न चालु आहेत